दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक ६९ वा मंगळवार दि.१३ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




## मायमाऊलींची सेवा करताना मरण आलं तरी अभिमान

जळगाव : जर बहिणींच्या कल्याणासाठी काम करताना माझं बरंवाईट झालं तरी मला पर्वा नाही. गेल्या ३३ वर्षापासून मी जनसेवेला समर्पित केले आहे. मी ते करत राहीन. जर हेच माझ्या नशिबात असेल, माझं भाग्य असेल तर माझा जीव गेला तरी या महानभूमीतील लोकांच्या मायमाऊलीच्या सेवेत काम करताना मरण पत्करावं लागलं तरी मला अभिमान वाटेल असं विधान उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केले आहे.

जळगाव येथे जनसन्मान यात्रेच्या भाषणात ते बोलत होते. अजित पवार म्हणाले की, काल मी नाशिकला आलो तेव्हा गुप्तचर विभागाने माझ्या जीवाला वाढलेल्या धोक्याबाबत चिंता व्यक्त केली. या बातम्याही पसरल्या. मलाही काही हिंट त्यांनी दिली. मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहणार आहेत तिथे जाताना काळजी घ्या अशा सूचना मला करण्यात आल्यात असं त्यांनी सांगितले.

त्याशिवाय मी जनसेवक आहे. गेली ३५ वर्ष महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरतोय. चांदा ते बांदा फिरलोय. गडचिरोलीच्या दुर्गम भागातही मी गेलो आहे. माझ्या मुलींनी,



बहिणींनी, महिलांनी, मायमाऊलींनी बांधलेल्या राख्या माझ्या हातावर आहेत. शेकडो राख्या महिला भगिनी मला बांधत असतात.

गुप्तचर विभागाने मला मालेगाव, धुळे यासारख्या ठिकाणी गेल्यावर माझ्या जीवाला धोका असल्याचं सांगितले. पण माझ्या हाताला माझ्या बहिणींकडून बांधलेल्या राख्या आहेत तोपर्यंत दुसऱ्या संरक्षणाची गरज नाही. त्यात माझ्या बहिणींचे माय माऊलींचे आशीर्वाद राखीचं सुरक्षा कवच आणि प्रेमाची ढाल असल्याने कोणताही धोका मला स्पर्श करू शकत नाही याचा मला ठाम विश्वास आहे असंही अजित पवारांनी म्हटलं.

## खरोळा येथील श्रीदत्त मंदिरास तीर्थक्षेत्र विकासाचा ब दर्जा मिळवून देणार आ. रमेशआप्पा कराड यांची ग्वाही

लातूर : – असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथील दिडशतकाहून अधिक काळापूर्वीच्या श्रीदत्त मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या तीर्थक्षेत्र विकासाचा ब दर्जा मिळून देणार असल्याची ग्वाही भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञ सांगता सोहळ्याच्या निमित्ताने भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड हे रविवारी खरोळा येथे आले असता त्यांनी श्रीदत्त मंदिर येथे जाऊन मनोभावे दर्शन घेतले. मागील काळात आ. रमेशआप्पा कराड यांनी दहा लक्ष रुपये खर्च्याचा सौर ऊर्जा निर्मिती योजना दिली होती. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून मंदिर ट्रस्टला दरमहा येणाऱ्या ६ – ७ हजार रुपये विज बिलाची बचत झाल्याने समाधान व्यक्त करून दत्त मंदिर ट्रस्टच्या वतीने यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार केला व आभार व्यक्त केले.

खरोळा येथील श्री दत्त मंदिर येथे सद्गुरु सदानंद महाराज यांची दिड शतकाहून पूर्वीची जिवंत समाधी असून या मंदिर परिसरात वर्षभर दत्त जयंती सोहळा, श्रावणमास,



जन्मअष्टमी यासह विविध उत्सव मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरे केले जातात प्रत्येक कार्यक्रमास खरोळा आणि परिसरातील हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात.

अत्यंत जुन्या काळातील श्री दत्त मंदिर असून या मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास व्हावा येणाऱ्या भाविक भक्तांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी निश्चितपणे लवकरात लवकर राज्य शासनाचा तीर्थक्षेत्र विकासाचा 'ब' दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे अशी माहिती मंदिर विश्वस्त आणि ग्रामस्थ यांच्यासमवेत चर्चा करताना आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, रेणापूर तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, माजी जीप सदस्य सुरेंद्र गोडभरले, रमा फुलारी, श्री दत्त मंदिर ट्रस्टचे संजय राऊतराव, सोमनाथ दवणे, तात्या राऊतराव, शिवदास मोत्तमफळे, महादेव बाडे, त्याचबरोबर चेअरमन मोहनराव राऊतराव, शालिक गोडभरले, मोहन आडतराव, राजकुमार मानमोडे, शरद राऊतराव, हनुमंत राऊतराव, सतीश राऊतराव, दयानंद जाधव, सचिन आडतराव, प्रल्हाद फुलारी, गणेश विद्वंत, विजय ताथोडे, गजानन जोशी संतोष कुलकर्णी यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

## नागपुरात मनसैनिकांचा खळ्ळखट्याक्

नागपूर : प्रतिनिधी शहराच्या तीस किलोमीटरच्या परिसरात टोलनाका नको असा नियम असताना वाहनधारकांकडून टोल आकारला जात असल्याचा आरोप करत मनसेने नागपुरात टोलनाका फोडत आंदोलन केले. दरम्यान, राज्यात सध्या नेतेमंडळीचे दौरे सुरू असून मनसे अध्यक्ष राज ठाकरेंच्या दौ–याला बीडमध्ये शिवसेना पदाधिका–यांनी विरोध केल्याने मनसे विरुद्ध शिवसेना असा वाद रंगला आहे. आता, नागपूरमध्ये मनसैनिकांनी टोलनाक्यावर



पुन्हा एकदा खळ्ळखट्याक् केल्याचे पाहायला मिळाले. शहराच्या तीस किलोमीटरच्या परिसरात टोलनाका नको असा नियम असताना वाहनधारकांकडून टोल आकारला जात असल्याचा आरोप करत मनसेने हे आंदोलन केले. यावेळी पोलिसांनी ५ मनसे कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. नागपूरजवळच्या वाडी शहराच्या अवतीभोवती राज्य महामार्गावर १० किलोमीटरच्या अंतरामध्येच तीन टोलनाके आहेत. या तीनही टोलनाक्यांवर खासगी वाहनांकडून टोल वसूल केला जात नाही.

## सोयाबीन अनुदान योजनेत वगळलेल्या वरवडा आणि वानवडा गावाचा समावेश करावा

### ई पीक पाहणी अट शिथील करावी आ. कराड यांची शासनाकडे मागणी

लातूर : – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघासह संपूर्ण जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदान योजनेपासून बहुतांशी शेतकरी वंचित राहत असल्याने या अनुदानासाठी असलेली पिक पेरा (ई पीक पाहणी) पाहणीची अट शासनाने रद्द करावी त्याचबरोबर या योजनेसाठी पात्र असतानाही वगळलेल्या भादा सर्कलमधील मौजे वरवडा आणि वानवडा या दोन गावाचा समावेश करुन शेतकऱ्यांना आर्थीक मदत करावी अशी मागणी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि कृषी मंत्री यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

जागतिक बाजारात सोयाबीन या तेल बियांचे भाव कोसळल्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना कमी भावात सोयाबीनची विक्री करावी लागली असल्यामुळे राज्यातील महायुती शासनाने हेक्टरी पाच हजार रुपये दोन हेक्टर पर्यंत मदत जाहीर केली आहे. याबाबत शासनाचे कर्मचारी कार्यरत करत असून ई पिक पाहणी नुसार गाव निहाय याद्या तयार करण्यात आल्या आहेत असे पत्रात नमूद करून आ. रमेशआप्पा कराड यांनी या अनुदान योजनेसाठी खेड्यापाड्यातील, वाडी वस्तीतील शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंद करता आली नाही, काही शेतकऱ्यांनी मोबाईल वरून ऑनलाईन करूनही त्यांचा पीक पेरा आला नाही त्यामुळे बहुसंख्य शेतकरी शासनाच्या या अनुदान योजने पासून वंचित राहत आहेत असे बोलून दाखविले.



शेतकऱ्यांना कमी भावात सोयाबीनची विक्री करावी लागली हे सूर्यप्रकाशा इतके सत्य असल्याने याबाबत शासनाने जाहीर केलेल्या अनुदानाचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा. यासाठी पिक पाहणीची अट शिथील करून संकटात सापडलेल्या कष्टकरी शेतकऱ्यांना अनुदान मिळवून देण्यासाठी मदत करावी त्याचबरोबर लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कलमधील मौजे वरवडा आणि वानवडा ही दोन गावे पात्र असतानाही वगळण्यात आली आहेत. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी अनुदान योजनेत या दोन्ही गावाचा समावेश करावा आणि शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे आणि राज्याचे कृषिमंत्री धनंजयजी मुंडे यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

## माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री, विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त बाभळगाव येथील विलास बागेत, आदरांजली सभा

लातूर /प्रतिनिधी :– महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री माजी केंद्रीय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १२ व्या स्मृतिदिनानिमित्त १४ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९ वाजता बाभळगाव येथील विलास बागेत सार्वजनिक आदरांजली सभा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी अभिजात भारतीय संगीत परंपरेतील आघाडीचे युवा गायक पंडित शौनक अभिषेकी यांचा भक्ती संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने आपल्या आयुष्य जगता यावे यासाठी आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांनी कृषी, सहकार, शिक्षण उद्योग, व्यापार यासह विविध क्षेत्रात योगदान देऊन मोठे कार्य उभे केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या स्मृतिदिनी बाभळगाव येथे होणाऱ्या आदरांजली सभेस दरवर्षी राज्य आणि देशभरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, आणि नागरिक यांची मोठी उपस्थिति असतात. १४ ऑगस्ट २०२४ रोजी बाभळगाव येथील विलास बागेत होणाऱ्या या आदरांजली सभेच्या निमित्ताने या ठिकाणी सुप्रसिद्ध संगीतकार



पंडित जितेंद्र अभिषेकी यांचे सुपुत्र आणि अभिजात भारतीय संगीत परंपरेतील आघाडीचे युवा गायक म्हणून ज्यांची ख्याती आहे, असे पंडित शौनक अभिषेकी यांचा संतवाणी हा कार्यक्रम सादर होणार आहे. अगदी लहान वयापासूनच आपल्या वडिलांचा शास्त्रीय संगीताचा पारंपारिक वारसा ०चालवणारे पंडित शौनक अभिषेकी हे शास्त्रीय संगीत, भक्तीसंगीत संतवाणी, नाट्यसंगीत या क्षेत्रात देश विदेशात सुपरीचित झाले आहेत, त्यांच्या या संतवाणी कार्यक्रमादरम्यान, संजय हिंगणे, पंकज शिरभाने, तुकाराम आव्हाड, हे त्यांना संगीत साथ देणार असून, संगीत संयोजन तालमणी डॉ. राम बोरगावकर हे करणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, बाळकृष्ण धायगुडे करणार आहेत, आदरांजली कार्यक्रमाची सुरुवात सकाळी बरोबर ९ वाजता होणार आहे त्यामुळे सर्वांनी विलास बागेतील स्मृतीस्थळी सकाळी ठीक ८.५५ वाजन्यापूर्वी स्थानापन्न व्हावे अशी नम्र विनंती देशमुख कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेसाठी लातूर ग्रामीण मध्ये एक लाख पात्र लाभार्थी

### एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये ऋषिकेशदादा कराड यांची सूचना

लातूर : – मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील पात्र ९९ हजार ११५ लाभार्थ्यांना प्रत्येकी दीड हजार रुपये याप्रमाणे १४ कोटी ८६ लक्ष ७२ हजार ५०० रुपये एवढी एका महिन्याची रक्कम वाटप करण्यासाठी शिफारस योजना समिती ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या आढावा बैठकीत करण्यात आली असून या योजनेपासून एकही पात्र महिला लाभार्थी वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या अध्यक्षपदी ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांची तर अशासकीय सदस्य म्हणून कुलदीप सूर्यवंशी आणि राजकिरण साठे यांची जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गिरीशजी महाजन यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार नुकतीच नियुक्ती केली आहे.

नव्याने गठीत करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचे अध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी उप विभागीय कार्यालय लातूर येथे आढावा बैठक झाली. या बैठकीस समिती सचिव तथा उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, समिती सदस्य रेणापूर गटविकास अधिकारी सुमित जाधव, लातूर गटविकास अधिकारी तुकाराम भालके, बालविकास प्रकल्प अधिकारी शुभांगी क्षीरसागर, जया माळी, अशासकीय समिती सदस्य कुलदीप सूर्यवंशी आणि राजकिरण साठे यांची उपस्थिती होती.

या बैठकीत बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, मतदार संघातील एकही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधितांनी काळजी घ्यावी अशी सूचना करून, जे अर्ज अपात्र झाले आहेत अशा अर्जांना परिपूर्ण करून परत दाखल करावेत. इंटरनेट सुविधाअभावी उत्पन्नाच्या प्रमाणपत्रासाठी अडचणी येत असल्याने पर्यायी व्यवस्था करावी, त्याचबरोबर ग्रामीण भागात लाभार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज




भरून घेताना रेंजच्या येणाऱ्या अडचणीवर मात करून अर्ज दाखल करून घ्यावेत. प्रत्येक पात्र महिलेचा अर्ज भरला जावा, यासाठी विशेष खबरदारी घेण्यात यावी अशा सूचना केल्या.

समितीच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत रेणापूर तालुक्यातून १९ हजार १ आणि लातूर तालुक्यातून ८५ हजार ५५० असे एकूण १ लाख ४ हजार ५५१ लाभार्थ्यांनी अर्ज दाखल केले. त्यातील छाननीअंती ९९ हजार ११५ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. या सर्व लाभार्थ्यांना प्रत्येकी दीड हजार रुपये याप्रमाणे एका महिन्याच्या हप्त्याची १४ कोटी ८६ लक्ष ७२ हजार ५०० रुपये एवढी रक्कम वाटप करण्यासाठी शिफारस करण्यात आली.

दरम्यान राज्यातील महायुती शासनाच्या वतीने दोन महिन्याची रक्कम पात्र महिलांच्या खात्यावर जमा करण्याच्या प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देऊन ऋषिकेश दादा कराड यांच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेसाठी अर्ज भरून घेण्यासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या अंगणवाडी कार्यकर्तीचा यावेळी सत्कार करण्यात आला.

## संपादकीय....

### धनखड यांच्यावर महाभियोग आणण्याची तयारी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सलग तिसर्यांदा स्थापन झालेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारला पहिल्या दोन महिन्यांच्या प्रवासातच विरोधकांच्या जोरदार विरोधाला सामोरे जावे लागत आहे. यावेळी विरोधक राज्यसभा सभापती जगदीप धनखड यांच्यावर महाभियोग आणण्याच्या तयारीत आहेत. या प्रस्तावावर ५० हून अधिक खासदारांनी स्वाक्षर्या केल्या असून, तो राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांना सादर केला आहे. तो अद्याप सभागृहात आणला गेला नाही; मात्र विरोधकांनी सभापतींविरोधात महाभियोग प्रस्ताव आणला जाईल, असा प्रचार सुरू केला आहे. लोकसभेत ओम बिर्ला आणि राज्यसभेत जगदीप धनखड हे विरोधकांच्या निशाण्यावर आहेत. दोन्ही पीठासीन अधिकार्यांना विरोधकांकडून सातत्याने घेराओ घातला जात आहे. ओम बिर्ला आपल्या बुद्धीने यातून बाहेर पडतात; मात्र राज्यसभेचे सभापती धनखड हे अनेक वेळा विरोधकांच्या जाळ्यात अडकल्याचे दिसत आहेत. राज्यसभेत संख्याबळ कमी होऊनही विरोधक आक्रमक झालेले पाहून सत्ताधारी पक्ष आश्चर्यचकित होत आहे. विरोधकांच्या आक्रमकपणामागे सोनिया गांधी यांची राज्यसभेतील उपस्थिती कारणीभूत असल्याचे मानले जात आहे. खर्गे हे विरोधी पक्षनेतेपदावर विराजमान असले, तरी रणनीतीची जबाबदारी सोनिया गांधी यांनी पूर्णपणे स्वीकारली आहे. सोनिया गांधी यांच्या उपस्थितीमुळे काँग्रेसमध्येच नाही, तर इतर विरोधी पक्षांमध्येही उत्साह दिसून येत आहे. सोनिया गांधी यांच्या उपस्थितीने सत्ताधारीही थोडे अस्वस्थ होतात. सभापतींविरुद्धच्या महाभियोग प्रस्तावामागेही सोनिया गांधी यांची रणनीती असल्याचे मानले जात आहे. या प्रस्तावाच्या निमित्ताने विरोधकांना सत्ताधारी आणि पीठासीन अधिकारी या दोघांवर दबाव आणायचा आहे. सभागृहात महाभियोग प्रस्ताव मंजूर होणे कठीण आहे, हे विरोधकांना चांगलेच माहीत आहे. असे असतानाही ते आणण्यासाठी विरोधक ठाम आहेत. यामागे विरोधकांचे राजकारण दडले आहे. महाभियोग प्रस्ताव आणल्याने सभापती जगदीप धनखड नक्कीच संशयाच्या भोवर्यात येतील. याशिवाय जोपर्यंत या विषयावर सभागृहात चर्चा सुरू राहते, तोपर्यंत सभापतींना सभागृहात येता येणार नाही. महाभियोग प्रस्ताव मांडल्यानंतर त्यांच्यावर सरकारला पाठिंबा दिल्याचा आरोप होणार आहे. याचे भांडवल सभागृहात आणि सभागृहाबाहेर करण्यात विरोधक यशस्वी होतील. या संपूर्ण प्रक्रियेत विरोधी पक्ष जिंको किंवा हरो, त्यांच्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. सभापतींबाबत विरोधकांच्या या रणनीतीचे कारणही स्पष्ट झाले आहे. सभागृहातच विरोधकांच्या चुकांसाठी सभापती जाहीरपणे त्यांची निंदा करतात; मात्र सत्ताधार्यांच्या चुकांकडे दुर्लक्ष करतात. जेव्हा प्रकरण वाढू लागते, तेव्हा ते सत्ताधारी पक्ष व विरोधकांना आपल्या दालनात बोलवतात आणि तडजोड करण्याचा प्रयत्न करू लागतात. सभापतींच्या या पावलाने संपूर्ण देश सभागृहातील घटनेचा साक्षीदार झाला आहे. विरोधक लोकांच्या नजरेत दोषी ठरतात; पण सत्ताधार्यांकडून अशीच चूक झाली की, पडद्याआडून सोडवली जाते. त्यामुळे सत्ताधार्यांच्या चुका जनतेला कळत नाहीत. राज्यसभा सभापतींच्या या वर्तनावर विरोधक गेल्या अनेक वर्षांपासून आक्षेप घेत आहेत. यापूर्वीच्या सरकारच्या काळातही विरोधकांनी सभापतींविरोधात महाभियोग आणणार असल्याची चर्चा रंगली होती; पण ही काँग्रेस व तृणमूल काँग्रेसची वेगळी कसरत होती. त्यामुळे ते पुढे जाऊ शकले नाही; मात्र मोदी सरकारच्या तिसर्या कार्यकाळात लोकसभेतही विरोधक मजबूत झाले आहेत. राज्यसभेतील विरोधकांची संख्या कमी झाली असली तरी लोकसभेतील संख्याबळ व सोनिया गांधी यांच्या उपस्थितीचा परिणाम दिसू लागला आहे. सर्व विरोधी पक्षांच्या मनात सोनिया गांधी यांच्याबद्दलचा आदर स्पष्टपणे दिसून येतो. दोन-तीन दिवसांपासून विरोधकांमध्ये महाभियोग प्रस्तावाची तयारी सुरू होती; पण योग्य संधीचा शोध सुरू होता. जया बच्चन आणि जगदीप धनखड यांच्यातील खडाजंगीमधून हा प्रसंग आला. यानिमित्ताने संपूर्ण विरोधकांनी एकत्र येत सभापतींच्या वागणुकीचा निषेध केला. सत्ताधारी पक्षातील काही खासदारांनीही सभापतींचे हे वर्तन योग्य मानले नाही; मात्र ते त्यांच्या पक्षश्रेष्ठींपेक्षा वेगळी विधाने करू शकत नाहीत. त्यामुळे सत्ताधारी पक्ष सर्व शक्तीनिशी सभापतींच्या बाजूने उभा आहे. अशा स्थितीत महाभियोग प्रस्तावाच्या निमित्ताने देशाला, मोदी सरकारला व दोन्ही सभागृहांच्या पीठासीन अधिकार्यांना संदेश देण्याची रणनीती विरोधकांनी आखली आहे. महाभियोग प्रस्तावाचाही घटनेत उल्लेख आहे. घटनेच्या अनुच्छेद ६१, १२४ (४), (५), २१७ आणि २१८ मध्ये याचा उल्लेख आहे. संविधानाचे उल्लंघन, गैरवर्तन किंवा अक्षमता सिद्ध झाल्यावरच महाभियोग प्रस्ताव आणता येतो. नियमांनुसार संसदेच्या कोणत्याही सभागृहात महाभियोग प्रस्ताव आणता येतो; मात्र तो लोकसभेत मांडण्यासाठी १०० खासदारांच्या सह्या आवश्यक आहेत, तर राज्यसभेत मांडण्यासाठी ५० खासदारांच्या सह्या आवश्यक आहेत. घटनेच्या अनुच्छेद ६७ मध्ये राज्यसभेच्या सभापतींना हटवण्याचे कारण दिले आहे. अध्यक्षांविरुद्ध महाभियोग प्रस्ताव आणल्यास ते पीठासीन अधिकार्याच्या खुर्चीवर बसू शकत नाहीत. हा प्रस्ताव राज्यसभेच्या उपसभापतींसमोर मांडला जाईल. उपसभापती प्रस्ताव स्वीकारू किंवा नाकारू शकतात. प्रस्ताव मान्य असल्यास त्यावर चर्चा केली जाते. हा ठराव उपस्थित असलेल्या आणि मतदान करणार्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांच्या विशेष बहुमताने (किमान १६७ सदस्य) पास होणे आवश्यक आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यास समिती किंवा न्यायाधीशांद्वारे तपास केला जातो व अहवाल सभागृहात सादर केला जातो.

# यापुढला बांगलादेश कसा असेल?

बांगलादेशात जे ‘काळजीवाहू सरकार’ स्थापन झाले आहे, त्यात विद्यार्थी आंदोलनाच्या दोघा नेत्यांचा समावेश आहे ही जमेची बाजू. या सरकारमधील सुप्रदीप चकमा हे एकमेव नाव अल्पसंख्याकांना दिलासा देणारे आहे. सुप्रदीप चकमा हे मुत्सद्दी आणि माजी राजदूत आहेत, तर ग्रामीण बँक आणि बँक ऑफ बांगलादेशमधील अनुभवी अर्थकारणी, लष्करी तज्ज्ञ यांबरोबरच मानवी हक्क कार्यकर्त्यांचा समावेशही या सरकारमध्ये आहे. कट्टर इस्लामींचे प्रतिनिधित्व करणारे ए. एफ. एम. खालिद हुसेन (हिफाजत- ए- इस्लाम पार्टी) हे एकमेव आहेत. बांगलादेशातील माझे परिचित सध्या तरी या सरकारबद्दल आशावादी आहेत हे परिचित २०१७ पासूनचे अनेकजण! एप्रिल २०१७ बांगलादेशातील ढाका विश्वविद्यालयामध्ये बांगलादेश स्टूडंट युनियन या विद्यार्थी संघटनेच्या अधिवेशनासाठी मी निमंत्रित म्हणून गेलो, अशाच कार्यक्रमासाठी पुन्हा फेब्रुवारी २०१९ मध्ये ढाका विश्वविद्यालय व जहांगीर विश्वविद्यालय या ठिकाणी जाणे झाले. तेथील विद्यार्थ्यांशी अनौपचारिक, औपचारिक गप्पा मारल्या, सोबत राहिलो, चर्चासत्रांमध्ये भाग घेतला. भारतीय किंवा जगातील इतर देशांसमोर बांगलादेशचे जे चित्र रंगवले जाते निश्चितच त्यापेक्षा तेथील समाज विशेषत: विद्यार्थी व शैक्षणिक विश्व हे बहुसंस्कृतिक वातावरणाला पोषक आहे याचा प्रत्यय आला. आज त्या देशात तरुणांनी आणि विद्यार्थ्यांनीच परिवर्तन घडवले असले तरी, पुढला बांगलादेश कसा असेल? याविषयी या काही नोंदी.

बांगलादेशातील काही धर्मांध संघटना व राजकीय पक्ष हे अल्पसंख्यांकांच्या विरोधात भूमिका घेतात हे वास्तव आहे पण हे पूर्ण सत्य नाही. आजही बांगलादेशमध्ये धर्मापेक्षा बांगला भाषिक अस्मिता ही जास्त महत्त्वाची मानली जाते. दुर्गा पूजा, सरस्वती पूजा साजरी होते. ढाका विश्वविद्यालय, जहांगीर विश्वविद्यालय यासारख्या अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये तेथील प्रत्येक विभागातील विद्यार्थी व शिक्षक दुर्गा पूजेचे मंडप उभारून मेजवानीसहित उत्सव साजरा करतात. यामध्ये मुस्लिम विद्यार्थ्यांची संख्या जास्त असते. या विश्वविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये बुद्धांचे पुतळे आहेत. भारतातील जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयातील विद्यार्थी चळवळीसारख्याच प्रगतिशील चळवळी तेथील विद्यापीठांमध्ये आहेत. तेथील एकंदर १७ कोटी २२ लाख लोकसंख्येपैकी मुस्लिम १५ कोटी ३६ लाख, हिंदू एक कोटी ३१ लाख , बौद्ध १० लाख सात हजार, ख्रिश्चन चार लाख ९५ हजार अशी वैविध्यपूर्ण रचना आहे. धार्मिक मूलतत्त्ववादी संघटनांचा अपवाद वगळता सर्व सामान्य लोक हे गुण्यागोविंदाने व शांततेत राहतात. तेथे अनेक जुनी पारंपरिक मंदिरे आज देखील अस्तित्वात आहेत. अल्पसंख्यांक हिंदू हे आपल्या परंपरांचे पालन विना भय करतात. ही गोष्ट तेथील धर्माला संघटनांना खुपत असते. ही बहु सांस्कृतिक परंपरा दुभंगण्यासाठी या संघटनांनी खूप प्रयत्न केले. पण त्यात त्यांना यश आलेले नाही. आजदेखील तिथे पश्चिम बंगालमधील बंगाली साहित्य, चित्रपट, भारतीय हिंदी चित्रपट, भारतीय दूर चित्रवाहिन्या, कलाकार हे खूप लोकप्रिय आहेत. पश्चिम बंगाल व बांगलादेशमधील लोकांचे परस्परांचे रक्ताचे नातेसंबंध अजूनही टिकून आहेत. नातेवाईकांच्या घरी त्यांना भेटण्यासाठी सीमापार कुटुंबे अजूनही जात असतात. बंगाली संस्कृतीची रुजलेली खोलवर मुळे पाहता येथे विशिष्ट धर्माधिष्ठित शासन प्रणाली जबरदस्तीने लागू करून लोकांना नियंत्रित करणे फार काळ शक्य नाही. खरे प्रश्न निराळे आहेत. वाढती बेरोजगारी बांगलादेशमध्ये पाच लाखाहून अधिक सरकारी पदे रिक्त आहेत. बांगलादेशमध्ये ११ कोटी लोकसंख्या ही श्रमिक लोकसंख्या आहे. त्यापैकी तीन कोटी लोकसंख्या ही बेरोजगार आहे. दरवर्षी १८ ते १९ लाख नवीन तरुणांचा श्रम बाजारात प्रवेश होतो. अशा अवस्थेत, चांगला पगार व प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या सरकारी नोकऱ्या या स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबीयांच्या नावाखाली अवामी लीगच्या कार्यकर्त्यांना देण्याची योजना वादग्रस्त ठरणारच होती. शिवाय यामध्ये मोठा भ्रष्टाचार आहे. स्वातंत्र्य सैनिक कोण ही ठरवण्याची पद्धत ही अपारदर्शी आहे. सरकार आपल्या आवामी लीग पक्षाच्या कार्यकर्त्यांना स्वातंत्र्य सैनिक म्हणून घोषित करते. ज्यामध्ये ज्यांचा स्वातंत्र्य चळवळीशी काही संबंध नाही अशा लोकांनाही घुसडले गेले. अगोदरच बेरोजगारीने पिचलेल्या समाजामध्ये अशा स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांना व नंतर नातवंडांना पर्यायाने अवामी लीग या राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना आरक्षण देणे हे विद्यार्थ्यांना अमान्य असल्यामुळेच बांगलादेशमध्ये उद्रेक झाला. एकूण नोकऱ्यांपैकी बांगलादेशमध्ये ५६ टक्के आरक्षण होते, तर ४४ टक्के जागा गुणवत्तेवर भरल्या जायच्या. यापैकी महिला (१० टक्के), मागास जिल्ह्यांतील तरुण (१० टक्के), अल्पसंख्याक समुदायांतील उमेदवार (५ टक्के) आणि अपंग (१ टक्का) हे आरक्षण



यापुढेही राहील, पण स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना मिळणारे ३० टक्के आरक्षण आता इतिहासजमा होऊन ६४ टक्के जागा खुल्या राहातील, अशी आशा आहे. आरक्षणविरोधी आंदोलन चालवणाऱ्या समूहाने आपले नाव ‘छात्र अधिकार परिषद’ ठेवले होते. पुढे या संघटनेत फूट पडली व त्यातून ‘गणतंत्रिक छात्र शक्ती’ अशी नवी संघटना तयार झाली. त्यांनी ‘स्टुडन्टस अगेन्स्ट डिस्क्रिमिनेशन’ ही समन्वय समिती तयार करून त्यात इतर नवीन विद्यार्थ्यांना समूहांच्या प्रतिनिधींनाही स्थान दिले. या आंदोलनातील कार्यकर्त्या-विद्यार्थ्यांवर अवामी लीगच्या ‘छात्र लीग’ या विद्यार्थी संघटनेने समोरासमोर हल्ले चालू ठेवले. पोलीस व छात्र लीग यांच्यासोबत झालेल्या संघर्षांमध्ये पोलिसांच्या आकडेवारीनुसार ३०० आंदोलक विद्यार्थी मारले गेले. पण आंदोलक सांगतात की, हा आकडा एक हजारापर्यंत आहे. कारण अनेक विद्यार्थी गायब असल्याचे आंदोलक सांगत आहेत. अशा आंदोलन हाताळण्याच्या पद्धतीमुळे शेख हसीना सरकारच्या हातातून हे आंदोलन नियंत्रणाबाहेर गेले. शिवाय पंतप्रधान हसीना यांनी आंदोलकांना रझाकार, देशद्रोही म्हणण्यामुळे आगीत तेल ओतले गेले. विद्यार्थ्यांच्या मनात भावना निर्माण झाली होती की शेख हसीना यांनी बांगलादेशातील न्यायपालिकेवरही दबाव आणून स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांचे आरक्षण कायम ठेवले असावे. मात्र ही कटुता आता आवरावी लागेल. धर्मांधांचे आव्हान कायम जमात-ए- इस्लामी व बांगलादेश नॅशनल पार्टीच्या कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्यांवर हल्ले करून तेथील हत्यारे लुटली आहेत. आता त्यांच्या शेकडो हातामध्ये हत्यारे आहेत. शिवाय त्यांनी मोठे तुरुंग फोडून त्यातील अत्यंत गंभीर गुन्ह्याखाली तुरुंगात असलेल्या गुन्हेगारांना तुरुंग फोडून बाहेर काढले आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करून ती हत्यारं जप्त करण्याचे सर्वात मोठे आव्हान सैन्य दलासमोर आहे. सैन्य दलाने ज्या पद्धतीने या धार्मिक कट्टर संघटनांसमोर संशयास्पदरीत्या मवाळ भूमिका घेतली आहे त्यातून हिंसाचार नियंत्रणात येण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायाने- विशेषत: संयुक्त राष्ट्रांनी हस्तक्षेप करायला हवा. बांगलादेशातील इस्लामी अतिरेक्यांनी २०१३ ते २०१६ दरम्यान देशात अशांततेच्या काळात हल्ले केले, तेव्हा अनेक धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी लेखक, ब्लॉगर आणि प्रकाशक; परदेशी; समलिंगी; हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन आणि अहमदींसारख्या धार्मिक अल्पसंख्यांकांना लक्ष्य करण्यात आले. मुस्लिम अतिरेक्यांनी अनेकांचा बळी घेतला. अशा हल्ल्यांमध्ये २ जुलै २०१६ पर्यंत २० परदेशी नागरिकांसह एकूण ४८ लोक मारले गेले होते. या हल्ल्यांसाठी प्रामुख्याने अन्सारुल्ला बांगला टीम आणि ‘इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया’ (आयसिस) ची स्वघोषित बांगलादेश शाखा यांसारख्या अतिरेकी गटांना जबाबदार धरले गेले होते. मात्र जून २०१६ मध्ये शेख हसीनांच्या सरकारने अखेर या धर्मांधांवर कारवाई सुरू केली. आठवड्याभरात ११ हजारांहून अधिकजणांची धरपकड करण्यात आली. विद्यार्थी आंदोलनाच्या काळात याही लोकांनी पुन्हा डोके वर काढले असण्याची शक्यता दाट आहे. शेख हसीना यांचे अवामी लीगचे सरकार घालवल्यावर, तेथे धार्मिक कट्टरपंथी बांगलादेश नॅशनल पार्टी किंवा जमात-ए इस्लामी यांचा पर्याय देणे म्हणजे रोगापेक्षा इलाज भयंकर ठरेल. हे टाळणार कसे? स्टुडन्ट अगेन्सट डिस्क्रिमिनेशन या बॅनरखाली चाललेल्या विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाचा जन्म हा केवळ दीड दोन महिन्यांचा आहे. त्यामुळे त्याच्याकडून काहीतरी राजकीय विचार व व्यापक पर्याय देण्याची अपेक्षा करणे हे अतिशयोक्ती ठरेल. म्हणून तेथील लेखक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, कलाकार, निवृत्त सनदी अधिकारी, निवृत्त न्यायाधीश, वकील, शिक्षण तज्ञ अशा नागरी समाजातील प्रतिष्ठित लोकांनी पुढाकार घेऊन बांगलादेशमध्ये वैचारिक मंथन घडवून आणले पाहिजे. विद्यार्थी व समाजातील विविध विभागांच्या लोकांमध्ये असलेले अस्वस्थतेचे समाधान करण्यासाठी किमान समान कार्यक्रम तयार करणे, ही पहिली गरज आहे.

अवामी लीग पक्षाच्या नेत्यांची घरे जाळणे, हत्या करणे यांसारख्या प्रकारांमुळे ही चळवळ भरकटत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. उद्रेक, आंदोलन व चळवळ या संकल्पना एकसारख्या जरी वाटत असल्या तरी व्यापकता व खोलीच्या दृष्टीने यामध्ये फरक आहे. बांगलादेशमध्ये जे काही मागील एक दीड महिन्याच्या कालावधीत घडले आहे त्याला उद्रेक म्हणता येईल. परकीय शक्तीदेखील आपल्या आर्थिक व राजकीय फायद्यासाठी याचा उपयोग करण्याचा धोका आहे. या उद्रेकाचा एका वैचारिक अर्थपूर्ण आंदोलनामध्ये रुपांतर करून त्याला चळवळीत परिवर्तित करणे व जनविरोधी सरकारी धोरणांच्या विरोधात जनहितांच्या धोरणांची आखणी करून त्याचा पर्याय देणे आता काळजीवाहू सरकारपुढले काम आहे. जुनी व्यवस्था नाकारणे हे जितके महत्त्वाचे आहे त्याहूनही त्याला सक्षम पर्याय देणे अधिक महत्त्वाचे आहे.

# अतिशय दानशूर: अहिल्याबाई होळकर!

अहिल्याबाईंनी जनावरांसाठी डोण्या बांधून घेतल्या. पशुपक्ष्यांसाठी रुग्णोपचारांची व्यवस्था केली. सर्पदंशावर लगोलग उपचार व्हावेत म्हणून हकीम-वैद्य नेमले. स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्त ओवऱ्या ठेवल्या. मुंग्यांना साखर आणि जलचरांना कणकेच्या गोळ्या खाऊ घालण्यापर्यंत त्यांचा दानधर्म सढळ होता. असा हा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा प्रेरणादायी संकलित माहितीचा लेख वाचकांना समर्पित... संपादक.

गोरगरिबांना सणासुदीला त्या अन्नदान करीत, कपडे वाटत, थंडीच्या दिवसात घोंगड्या वाटल्या जात. त्यांनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. यांशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढानागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वर आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंढी, नाशिक, जांब-इंदूर, त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्ञयिनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे-चार धामेया ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रिकांची सोय केली. शिवाय त्यांनी जेजुरी येथे श्री मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेराव व गौतमीबाई यांच्या छत्र्या आणि महेश्वरला मुक्ताबाईंच्या स्मरणार्थ नाजूक कारागिरी केलेले मंदिर बांधले व कुंभेरीजवळ खंडेरावांच्या स्मरणार्थ छत्री बांधली.

मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्रीकर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती, हे त्यांचे आयुष्यच सांगते. एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदारवृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्य कारभार करणार? ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबा दादांशी त्यांनी अहिल्याबाईंविरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले होते. अहिल्याबाईंना कळले, तेव्हा त्या युद्धास तयार असल्याचे त्यांनी राघोबा दादास कळविले. राघोबांना ते अडचणीचे झाले. हरलो तर बाईकडून हरलो आणि जिंकलो तरी बाईशी युद्ध करण्यात कोणती मोठी मर्दुमकी? शेवटी राघोबांना माघार घ्यावी लागली. त्यांचा उत्तम पाहुणचार अहिल्याबाईंनी इंदुरात केला. अशा रीतीने बाईंच्या लौकिकात आणखीच भर पडली.

अहिल्याबाईंचा जन्म जिल्हा बीड येथील चौंडी या छोट्याशा गावात दि.३१ मे १७२५ रोजी माणकोजी शिंदे व सुशिलाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव यांचेशी झाले. खंडेरावांच्या आईचे नाव गौतमीबाई होते. ते व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्याबाईंनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या या सूनबाईंवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता. खुप महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्याबाईंवरच सोपवीत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. ती मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या ही होत. अहिल्याबाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या. पण सासरे म्हणाले- प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे.

आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा त्यांनी मान राखला. त्यांनी सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर असत, तेव्हा स्वतः अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत. मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानची जहागीर दिली होती. दौलतीचा कारभार मोठा होता. पण सन १७६६मध्ये त्यांचे निधन झाले. अहिल्याबाईंवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचा पुत्र मालेराव यांना जरी सुभेदारीची वस्त्रे मिळाली, तरी ती सांभाळण्याची त्यांच्यात कुवत नव्हती. लवकरच त्यांचे देहावसान झाले. अहिल्याबाई आता खऱ्या अर्थाने राज्यकर्ती झाल्या. पुढील अठ्ठावीस वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालविला. तिजोरीत भर घालत त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.

अहिल्याबाईंच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना त्यांचा लौकीक वाढविणारी आहे. आपली कन्या मुक्ताबाई हिचे स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहीर केले की, जो कोणी चोर, लुटारु, दरोडेखोर यांचा राज्यात बंदोबस्त करील, त्या शूर व्यक्तीशी मुक्ताबाईचा विवाह लाविला जाईल. त्यावेळी जातपात बघितली जाणार नाही. हा अलौलिक विचार जाहीर करून त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी कृतीही तशीच केली. यशवंतराव फणसे या गुणी, शूर तरुणाशी त्यांनी मुलीचा विवाह करून दिला. त्या एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली; मात्र शेतकऱ्यांकडून सारा घेणे चालू ठेवले. पाटील कुळकर्ण्यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यावेळी डोंगर मुलखातून भिल्ल व गोंड आदिवासी प्रवाशांना उपद्रव देत आणि त्यांच्याकडून भीलकवडी नावाचा कर वसूल करीत. तेव्हा बाईंनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर घेण्याचा हक्क मान्य केला. त्यांच्याकडून पडिक जमिनींची लागवड करून घेतली. शिवाय त्यांना विशिष्ट हद्द नेमून दिली. जमीन करार- पट्ट्याने देण्याची पद्धत सुरू केली.

अहिल्यादेवींनी सन १७७२ साली राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलविली. तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात प्रशस्त देवघर होते. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला व पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधल्या. महेश्वर हे विणकरांचे मध्यवर्ती केंद्र होते. त्यांनी वस्त्रोद्योगास उत्तेजन दिले. कोष्ट्यांची वसाहत स्थापन केली आणि उत्तम हातमागाची सणंगे तयार होतील, अशी पेठ कायम केली. त्यांचा मूळ स्वभाव सौम्य असला, तरी राज्यकारभारात त्यांनी मनरूपसिंगसारख्या कुविख्यात डाकूला फाशी दिली. त्यांच्या टांकसाळीतील नाण्यांवर बिल्वपत्र व शिवलिंग यांचे छाप असत. त्यांच्या धर्मपरायणतेला प्रांत मर्यादा नव्हती. त्यामुळे त्यांचे नाव आसेतू हिमाचल घेतले जाते. त्यांनी अन्नछत्रे उघडली, राज्यातून विहिरी खोदून त्या चिरेबंद बांधून दिल्या. उन्हाळ्यात राज्यातून प्रवास करणाऱ्यांसाठी पाणपोया, धर्मशाळा, पांथशाळा, आश्रयशाळा आदी बांधल्या.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. मोरापंत व शाहीर अनंत फंदी यांचा अहिल्याबाईंनी आदर-सत्कार करून अनंत फंदीस सल्लाही दिला आणि तमासगिरीपासून परावृत्त केले. अखेरच्या दिवसांत त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथ्याबा ऐन तारुण्यात गेला, तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली. अशा बिकट परिस्थितीत शिंद्यांचा सरदार गोपाळराव याने सन १७९२मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हा तरुणासही लाजवील, अशा तडफदारीने त्यांनी शिंद्यांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या; पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी चोख उत्तर दिले. दि.१३ ऑगस्ट १७९५ रोजी महेश्वर येथे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले.

!! पावन पुण्यस्मरण पर्वावर त्यांच्यातील कर्तबगारीला व महिलाशक्तीला मानाचा लवून मुजरा !!

**********

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
गडचिरोली, व्हा. नं. ९४२३७१४८८३.

# सम्यक संबुद्ध गौतमाने पृथ्वीतलावर अतुलनीय, अद्वितीय, अजोड अशा धम्मनगरीची स्थापना केली - ज्योती जयराम जाधव

मुंबई :– इ. स. पूर्व ५ व्या शतकामध्ये धर्माच्या नावाखाली समाज ग्रासला गेला होता, समाजाची पिळवणूक, फसवणूक केली जात होती, त्याचवेळी कपिलवस्तु नगरीचा राजपुत्र सध्धार्थ गौतम याने रोहीणी नदीच्या पाण्याच्या तंट्यावरून सत्यासाठी गृहत्याग केला आणि माणसा-माणसांमध्ये होणाऱ्या भांडणाचे कारण शोधण्याचा निर्धार केला. गौतमाने सहा वर्ष कठीण तपश्चर्या करून शरीराला क्लेश दिले; तरी त्यांना सत्याचा प्रकाश काही दिसला नाही म्हणून त्यांनी वैशाखी पौर्णिमेला निरंजना नदीच्या पश्चिमेस बोधीवृक्षाखाली पूर्वकडे तोंड करून जोवर सत्यज्ञानाचा प्रकाश दिसणार नाही तोवर आसनावरून उठणार असा वज्र संकल्प घेतला तेव्हा वैशाख पौर्णिमेच्या दिवशी अफाट अशा सैन्यासह मार चाल करुन आला अफाट मार सेनेशी बोधिसत्वाचे धनघोर असे युद्ध झाले, मार सेना म्हणजे राग, लोभ, द्वेष, मीपणा अश्या मार सेनेचा परावभ करीत सिद्धार्थ गौतम विजयी म्हणजेच सम्यक संबुद्ध झाले व त्यांनी या पृथ्वीतलावर अतुलनीय, अद्विितीय, अजोड अशा आजवर पृथ्वीवर कोणालाही न जमलेल्या धम्मनगर, धम्मराज्याची स्थापना केली. सम्यक संबुद्ध गौतमाने या धम्मनगराचा पाया श्रद्धा म्हणजेच विश्वास जो अंध नसून डोळस आहे अश्या श्रद्धा, विश्वासावर स्थापन केला, तसेच या धम्मनगरीचे संरक्षण करण्यासाठी शीलेचा परिकोट रचला हे शील म्हणजे माणसाची नीतिमत्ता म्हणजेच पंचशील ज्याचे प्रत्येक मनुष्याने पालन करणे आवश्यक आहे ज्यामुळे राग, लोभ, द्वेष, आळस, मीपणा, अहंपणा हे शत्रू शीलेचा कोट (कुंपण) ओलांडून आत येऊ शकत नाही, या धम्मनगरीला गौतमाने ज्ञानाचे प्रवेशद्वार दिले, पूर्वी राज्यांच्या राजधानीला जसे प्रवेशद्वार असे व येणाऱ्या





जाणाऱ्यांची चौकशी करूनच त्यांना प्रवेश दिला जात असे तसेच धम्मनगरीत ही ज्ञानाची चौकशी करून प्रवेश दिला जात असे, या नगरास विजयाची न्यायालये दिली गेली कारण माणूस केवळ ज्ञानी, शीलवान, प्रज्ञावान असून चालत नाही त्याला विजयाची ही जोड आवश्यक असते म्हणून विजय न्यायालये बनवली गेली, अश्या धम्मनगरीत पंचशील, उपोसथव्रत, अष्टशील, दशशीलाचे पालन करणारे उपासक तसेच एकवेळ भोजन करणारे, पंच्याहत्तर नियमाचे तंतोतंत पालन करणारे, दोनशे सत्तावीस नियमांचे पालन करणारे, धुताणधारी अच्छेद भिक्षु, झाडाखाली रहाणारे, स्मशानामध्येच झोपणारे, भिक्षाटनावरच उदरनिर्वाह करणारे, चिंध्याचे चिवर वापरणारे, ज्यांच्या तृष्णा नाहीसा झाल्या आहेत जे श्रोतापती, सकृतागामी, अनागामी, अरहंत, जीवनमुक्त झाले आहेत असे निर्वाण सुखाचा आस्वाद घेणारे भिक्षु या धम्मनगरमध्ये राहत असे म्हणून धम्म ऐकून त्याप्रमाणे आचरण करणारा व धार्मिक असल्याचा अहंकार न करणाराच खरा धम्मनगरचा रहिवाशी धम्मधर होय असे प्रतिपादन ज्योती जयराम जाधव यांनी वर्षावास प्रवचन मालिकेचे तिसरे पुष्प गुंफत असताना केले. बौद्धजन पंचायत समिती संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे याही वर्षी सरसेनानी आदरणीय सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या मार्गदर्शन व अध्यक्षतेखाली वर्षावास प्रवचन मालिकेतील चौथ्या पुष्पाचे प्रवचन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, परेल, मुंबई - १२ येथे शनिवार दि. १० ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ७:०० वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सदर प्रसंगी राष्ट्रपुरुषांना मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पमाला अर्पण करून धार्मिक पूजापाठ संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार गुरुजी व सरचिटणीस मनोहर बा. मोरे गुरुजी यांनी मधुरवाणीने पार पाडला, पाहुण्यांचे स्वागत स्वागताध्यक्ष मंगेश पवार गुरुजींनी केले तर सूत्रसंचालन मनोहर मोरे यांनी लाघवी शैलीत करून उपस्थितांचे मन जिंकून घेतले. सदर प्रसंगी आदरणीय सभापती आनंदराज आंबेडकर, उपसभापती विनोद मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, सरचिटणीस राजेश घाडगे, खजिनदार नागसेन गमरे, माजी कार्याध्यक्ष व विश्वस्त किशोर मोरे, उपकार्याध्यक्ष अशोक कांबळे, एच. आर. पवार, मनोहर सखाराम मोरे, चंद्रमनी तांबे, चिटणीस श्रीधर साळवी, संदेश खैरे, विठ्ठल जाधव, यशवंत कदम, रवींद्र शिंदे, साहित्य क्रीडा समिती अध्यक्ष राजाभाऊ गमरे तसेच अतिरिक्त सरचिटणीस, चिटणीस, व्यवस्थापक मंडळाचे सदस्य, बौद्धाचार्य, उपासक, उपासिका, महिला मंडळ आदी अनेक मंडळी उपस्थित होते. सभापती आनंदराज आंबेडकर यांनी कार्यक्रमाचा आढावा घेत मौलिक असे मार्गदर्शन केले, तसेच ज्योती जयराम जाधव यांनी चौथे पुष्प गुंफत असताना सम्यक संबुद्ध झालेल्या तथागत गौतम बुद्धांनी धम्मनगरीची स्थापना कशी व का केली, खरा धम्मधर म्हणजे कोण यावर विस्ताराने जी मांडणी केली याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करीत आभार व्यक्त केले व उपस्थितांना मंगलकामना देत शुभेच्छा दिल्या, सरतेशेवटी मनोहर बा. मोरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# भिमशाहिर प्रदीप बागवान कडबे यांच्या गायनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन


नागपूर :– भिमशाहिर प्रदीप बागवान कडबे यांच्या गायनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन व भव्य जाहीर सत्कार नागपूर विहीरगाव भारत सरकार सांस्कृतिक मंत्रालय नवी दिल्ली वैभव सांस्कृतिक कला मंडळ नागपूर साम्यक सांस्कृतिक लोककला निकेतन परसाड ऑरेंज सिटी संस्था विहीरगाव नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती अंतर्गत लोक कलावंताच्या भव्य मेळावा रविवार दिनांक ११,८, २०२४ सकाळी अकरा ते पाच वाजेपर्यंत स्थळ वरिष्ठ प्राथमिक शाळा सभागृह विरगाव उमरेड रोड नागपूर येथे लोक कलावंताच्या मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला कार्यक्रमाचे उद्घाटक सुरज भाऊ शिंदे सरपंच ग्रामपंचायत विरगाव,, कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष जी गुजरकर जिल्हा परिषद सदस्य खरबी सर्कल, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी दिलीप जी कापसे सरपंच ग्रामपंचायत विरगाव, प्रमुख पाहुणे कैलास जी ठाकरे नितीन जी काळे शाहीर पुरुषोत्तम खांडेकर शाहीर निनाद बागडे शाहीर निशांत सुख दे वे शाहीर बादल खांडेकर शाहीर भगवान वानखडे प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे उद्धवराव बडगे त्यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रज्वलित करण्यात आले याप्रसंगी रामटेक तालुक्यातील



किरणापुर काचुवाही येथील युवा प्रबोधनकार भीम शाहीर बागवान कड बे यांनी आपल्या गायनाच्या माध्यमातून त्याग मूर्ती रमाई यांच्या गीतातून समाज प्रबोधन गीत सादर केले याप्रसंगी त्यांच्या भव्य जाहीर सत्कार करण्यात आला सर्वश्री शाहीर पुरुषोत्तमजी खांडेकर शाहीर निनाद बागडे शाहीर भगवान वानखेडे युवा प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे शाहीर उद्धव रावजी बडगे शाहीर निशांत सुख देवे विजय चकोले शाहीर मुकेश भाऊ गायिका अर्चना मोटघरे जोशना मेश्राम दीक्षा चव्हाण वर्षा शेंडे सपना ढिकले वंदना महेश कर सुकन्या ताई गीता पाठक वंदना लुगे संगीता गोंडाने सुनिता गुरुदे प्रवीण पाचे शाहीर बादल खांडेकर मोठ्या संख्येने शाहीर कलाकार उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कालीचरण शेंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन शाहीर पुरुषोत्तम खांडेकर यांनी केले

# यावर्षीचा स्वातंत्र्यदिन हटक्या पद्धतीने साजरा करा, घरी बनवा तिरंगा बर्फी

भारताचा स्वातंत्र्यदिन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भारत आपला ७८ वा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्टला साजरा करणार आहे. ब्रिटिशांच्या गुलामीतून स्वतःची सुटका करत भारताने फार कठीण त्यागानंतर हे स्वातंत्र्य मिळवले. त्यामुळेच हा दिवस आपण मोठ्या थाटामाटात साजरा करतो आणि मोठ्या शानाने आपला तिरंगा यादिवशी मिरवला जातो.



आम्ही तुम्हाला सांगतो की, यावर्षीचा स्वातंत्र्यदिन तुम्ही आणखीन खास बनवू शकता. आज आम्ही तुमच्यासाठी स्वातंत्र्यदिनानिमित्त एक खास आणि हटके रेसिपी घेऊन आलो आहोत. या रेसिपीचे नाव आहे तिरंगा बर्फी. भारतीय धवजाच्या रंगाने समृद्ध ही बर्फी तुम्ही स्वातंत्र्यदिन आपल्या प्रियजनांना देऊन स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देऊ शकता. हा हटके प्रकल्प नक्कीच सर्वांना आवडेल. चला तर मग जाणून घेऊयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. घरी बनवा तिरंगा ब साहित्य सुक्या खोबऱ्याची पावडर देशी तूप बारीक केलेले बदाम बारीक केलेले काजबारीक केलेले बेदाणे दूध छोटी वेलची पावडर पिठीसाखर केशरी आणि हिरवा रंग कृती

तिरंगा बर्फी बनवण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात नारळाची पावडर घ्या यानंतर त्यात पिठीसाखर, वेलची पावडर आणि दूध टाका आणि मिक्स करा आता हे मिश्रण छान कणकेप्रमाणे मळून घ्या यानंतर या तयार मिश्रणाचे तीन सामान भाग करून घ्या यातील एक भाग पांढरा राहील, म्हणजेच यात कोणताही कलर जाणार नाही दुसऱ्या भागात हिरवा आणि तिसऱ्या भागात केशरी रंग मिक्स करून नीट मळून घ्या आता सर्व प्रथम एका मोठ्या थाळीत नारळ पावडर शिंपडा यानंतर सर्व प्रथम हिरव्या पिठाचा थर या थाळीत पसरवा हिरव्या रंगाच्या वर हिरवा आणि हिरव्या रंगाच्या वर केशरी रंग पसरवा आता तयार केलेल्या बर्फीचे थर ३-४ तास सेट होण्यासाठी फ्रिजमध्ये ठेवून द्या

बर्फी सेट झाल्यानंतर चाकूच्या मदतीने तिचे काप करून घ्या अशाप्रकारे तुमची तिरंगा बर्फी तयार होईल




अनु.आदिवासी आश्रम शाळा परतूर येथिल शाळे बाहेर सुरू असलेल्या दि.०८/०८/२०२४ रोजीच्या उपोषणाची मागणी मान्य करण्यात येऊन महिलेस कामावर रुजू करून मागील पगार दिला जाणार आहे अशी वरील छायाचित्रात चर्चा झाल्या प्रमाणे तोंडी आश्वासनांनी कबूल केले असून सर्वांच्या समोर समक्ष हे बोलणे होऊन खरा खुलासा केल्या वरुन शनिवार दि.१०ऑगसस्ट-२०२४ रोजी रोजंदारी कामगार आदिवासी st वर्गातील महिलाचे बेमुदत आमरण उपोषण सोडविलेले आहे.

# स्तनपानामुळे होतो स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी, तज्ज्ञांचा खुलासा

आई आणि बाळासाठी स्तनपानाचे अनेक फायदे आहेत. नव मातांनी आपले बाळ निरोगी राहण्यासाठी आणि स्तनाच्या कर्करोगापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी स्तनपान करणे ही काळाची गरज आहे. स्तनाच्या कर्करोगामुळे महिलांमध्ये मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. पुण्यातील अपोलो स्पेक्ट्रा रूग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. नितीन गुप्ते म्हणाले की, स्तनपानामुळे आई आणि मूल यांच्यातील नातेसंबंध मजबूत होण्यास मदत होते तसेच बाळाचे आणि आईचे आरोग्य उत्तम राहते. आई आणि मुलाच्या आरोग्यासाठी स्तनपान आवश्यक आहे. स्तनपान दिले जाणाऱ्या बाळाला दमा, लठ्ठपणा, कान आणि श्वसन संक्रमण, नवजात बाळाचा अचानक मृत्यू होणे आणि अतिसार सारख्या पोटाच्या संसर्गाची शक्यता कमी असते. स्तनपानामुळे आईला रक्तदाब, टाईप २ मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, लठ्ठपणा, स्तन आणि गर्भाशयाचा कर्करोग टाळण्यास मदत होते. काय सांगतात तज्ज्ञ डॉ गुप्ते पुढे म्हणाले की, स्तनपानामुळे भविष्यात स्तनाचा कर्करोग होण्याचा धोका देखील कमी होतो. याशिवाय स्तनपानामुळे महिलांच्या शरीरातील इस्ट्रोजेन हार्मोनचे उत्पादनही कमी होते. इस्ट्रोजेन हा हार्मोन आहे जो स्तनाच्या ऊतींच्या वाढीस उत्तेजन देतो आणि उच्च इस्ट्रोजेन पातळी थेट स्तनाच्या कर्करोगाच्या वाढीव जोखमीशी संबंधित आहे. स्तनपानाचा सल्ला स्तनाचा कर्करोग हा मोठ्या संख्येने स्त्रियांमध्ये आढळून येणारा कर्करोगाचा एक सामान्य प्रकार आहे आणि त्यामुळे मृत्यूदर वाढतो. याशिवाय स्तनपान केल्याने गर्भधारणेदरम्यान वाढलेले वजन कमी करण्यास मदत होते. नवजात मातांना स्तनपानाच्या महत्त्वाबाबत शिक्षित केले पाहिजे. नव मातांना कमीत कमी सुरुवातीचे ६ महिने आणि जास्तीत जास्त १ वर्ष पोषक आहारासह स्तनपान करण्याचा सल्ला दिला जातो. कर्करोगाची शक्यता कमी टीजीएच-ऑन्को लाईफ कॅन्सर सेंटरचे सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. मृणाल परब म्हणाल्या की, स्तनपानामुळे स्तनाच्या ऊतींना कर्करोग होण्याची शक्यता कमी होते. स्तनातून दूध बाहेर



पडताना स्तनाच्या ऊती संकुचित होतात. या दरम्यान फॅट पेशी दूध तयार करणाऱ्या पेशींची जागा घेतात. या प्रक्रियेदरम्यान, मासिक पाळीच्या दरम्यान विकसित झालेल्या कोणत्याही असामान्य पेशी नष्ट होतात आणि स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी होतो. महिलांनी काय करणे आवश्यक ज्या स्त्रिया स्तनपानात करत आहेत त्या पौष्टिक आहार, शारीरिक हालचालींसह संतुलित जीवनशैलीचे पालन करतात, धूम्रपान आणि मद्यपान टाळतात त्यामुळे कर्करोगाची शक्यता कमी होते. या कर्करोगामुळे स्तनाच्या ऊतीमध्ये गाठ, स्तनाचा आकार बदलणे, स्तनाग्र उलट्या दिशेने वळणे, स्तनाग्रातून स्त्राव होणे यांसारखी लक्षणे दिसतात.

# आजाराचे लवकर निदान करण्यामध्ये सीटी स्कॅनचे महत्व

आधुनिक आरोग्य सुविधा मिळण्यामध्ये सीटी स्कॅन किंवा कॉम्प्युटेड टोमोग्राफी स्कॅन महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात, त्यामुळे लवकर निदान करणे शक्य होते. आधुनिक एक्स-रे आणि संगणकीय तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन, सीटी स्कॅन शरीराच्या तपशीलवार क्रॉस-सेक्शनल प्रतिमा तयार करतात. अंतर्गत अवयवांचे परीक्षण करण्याचा आक्रमक नसलेला एक मार्ग, यामुळे रोगांचे लवकर निदान होण्यामध्ये मदत मिळते, त्वरित आणि अचूक निदान झाल्याने रुग्ण आजारातून बाहेर पडण्याच्या शक्यतेमध्ये लक्षणीय वाढ होते.(फोटो सौजन्य-ळीींलज्ञ)

कर्करोग, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर यांसारख्या आजारांचे लवकर निदान झाल्यामुळे योग्य उपचार सुरू करणे शक्य होते. लवकर निदान करण्याच्या प्रक्रियेमध्ये सीटी स्कॅन महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. उदाहरणार्थ, फुफ्फुसाचा कर्करोग, जो त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात ओळखणे कठीण आहे, लो-डोस सीटी स्कॅनमुळे त्याचे निदान करणे सोपे झाले आहे. त्यामुळे रुग्णाचे आयुष्य वाढण्याच्या शक्यतेमध्ये भर पडू शकते. त्याचप्रमाणे, सीटी कोलोनोग्राफी किंवा व्हर्च्युअल कोलोनोस्कोपी, पॉलीप्स आणि ट्यूमरचे व्हिज्युअलायझेशन कोलोरेक्टल कॅन्सरचे लवकर निदान होण्यात मदत करते.

सीटी स्कॅनमुळे कोरोनरी आर्टरी डिसीज, ॲन्युरिझम आणि रक्ताच्या गुठळ्या यांसारखे रक्ताभिसरण यंत्रणेचे आजार असल्यास तेही समजू शकतात. याव्यतिरिक्त, यामुळे पाठीच्या कण्याचे आजार, मूतखडा, अल्सरेटिव्ह कोलायटीस आणि सायनुसायटिस सारख्या दाहकतेशी संबंधित रोगांचे निदान करणे शक्य होते. एखादा आघात झाल्यास, सीटी स्कॅन मुळे डोके, सांगाडा आणि अंतर्गत अवयवांच्या जखमांचे मूल्यांकन लवकर करणे शक्य होऊन आपत्कालीन उपचार करण्यासाठी आवश्यक माहिती मिळते.

सीटी तंत्रज्ञानाचा एक महत्त्वपूर्ण फायदा म्हणजे त्यामुळे उच्च-गुणवत्तेच्या ३डी प्रतिमा तयार करणे शक्य होते. आधुनिक सीटी स्कॅनरमध्ये स्पायरल पद्धतीने सातत्याने प्रतिमा काढणे शक्य होते, यामुळे जुन्या उपकरणांच्या तुलनेत शरीराच्या अंतर्गत संरचनांचे अधिक तपशीलवार चित्र स्पष्ट होते. यामुळे सूक्ष्म पातळीवरील विसंगती समजणे शक्य होते, कमी प्रगत इमेजिंग तंत्रामध्ये ज्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते.


तसेच आपत्कालीन औषधोपचार करण्यासाठी सीटी स्कॅन करणे देखील महत्त्वाचे आहे. आघाताच्या बाबतीत, फ्रॅक्चर, अवयवांचे नुकसान आणि अंतर्गत रक्तस्त्राव यासारख्या अंतर्गत जखमांची त्वरित आणि तपशीलवार माहिती मिळते. आपत्कालीन उपायात मार्गदर्शन करण्यासाठी हे त्वरित आणि अचूक निदान महत्त्वपूर्ण आहे, ज्यामुळे रुग्णांचे आयुष्य आणि बरे होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते.

प्रत्येक आरोग्यसेवा सुविधेमध्ये सीटी तंत्रज्ञान उपलब्ध असणे अनेक कारणांसाठी आवश्यक आहे. त्यामुळे तपशीलवार निदान माहिती त्वरित मिळते, जे आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक आहे. दुसरे म्हणजे, यामुळे गंभीर आजारात सातत्याने देखरेख करणे आणि काळजी घेणे शक्य होते, अचूक इमेजिंग माहितीच्या आधारे उपचार योजनांमध्ये योग्य ते बदल करणे शक्य होते. शेवटी, सीटी स्कॅनच्या सहज उपलब्धते मुळे नियमित तपासणीमध्ये मदत मिळते जेणेकरून आजारांचे वेळीच निदान होऊन आजार वाढण्याआधीच त्यावर योग्य उपाययोजना करणे शक्य होते.

# काही गोड होऊन जाऊद्यात, श्रावणी उपवासाला आवर्जून बनवा मखान्याची पौष्टिक बर्फी!

नुकताच श्रावण महिना सुरु झाला आहे. हा महिना भगवान शंकराला समर्पित केला जातो. या महिन्यात शंकराला प्रसन्न करण्यासाठी अनेकजण व्रत-उपवास करत असतात. आता उपवास म्हटलं की, उपवासाचे पदार्थ आलेच. साबुदाणा खिचडी, भगर, बटाट्याची उसळ हे पदार्थ तर तुम्ही अनेकदा खाल्ले असतील मात्र तुम्ही उपवासाचा गोड पदार्थ शोधत असाल तर आजची ही रेसिपी तुमच्या कामाची ठरणार आहे. आज आम्ही तुम्हाला मखान्याची पौष्टिक बर्फी कशी तयार करायची याची एक सोपी रेसिपी सांगत आहोत. ही बर्फी तुम्ही श्रावणी सोमवारात भगवान शंकरला समर्पितदेखील करू शकता. जाणून घ्या यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य २०० ग्रॅम मखाने २ वाटी नारळ पावडर २ वाटी शेंगदाणे २ पाकिट दूध पावडर १/२ वाटी तूप ४०० ग्रॅम दूध १ वाटी साखर ७-८ वेलची कृती उपवासाची पौष्टिक बर्फी तयार करण्यासाठी सर्वप्रथम एका नॉन-स्टिक पॅनमध्ये तूप घालून मखाने छान भाजून घ्या हे मखाने भाजून झाल्यानंतर एका प्लेटीत





काढून घ्या त्यानंतर त्यामध्ये शेंगदाणे घालून साधारण ५-१० मिनिट भाजून घ्या आता हे मखाने आणि शेंगदाणे मिक्सरमध्ये टाकून बारीक वाटून घ्या यानंतर आता दुसरीकडे गॅसवर एक भांडे ठेवा आणि त्यात दूध गरम करत ठेवा या दुधात साखर घालून मिक्स करा दुधाला उकळी आल्यानंतर त्यात मखान्याचे मिश्रण आणि मिल्क पावडर टाका आणि मिश्रण नीट ढवळून घ्या यानंतर आता हे मिश्रण एका प्लेटीत काढून सेट करण्यासाठी काही तास बाजूला ठेवून द्या मिश्रण छान सेट झाले की चाकूच्या मदतीने याचे काप करून घ्या अशाप्रकारे तुम्ही मखाना बर्फी तयार होईल

# साप केवळ शेतकऱ्यांचाच नव्हे तर संपूर्ण मानवजातीचा मित्र आहे : ॲड.बुद्धकुमार कांबळे



लातूर : पर्यावरणाचा खऱ्या अर्थाने संरक्षक असणारा साप हा प्राणी केवळ शेतकरी बांधवांचाच नव्हे तर संपूर्ण मानवजातीचा मित्र आहे,असे प्रतिपादन सर्प अभ्यासक तथा वन्यजीव पर्यावरण कायदेतज्ज्ञ ॲड.बुद्धकुमार कांबळे यांनी केले.

येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात नागपंचमीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना सापांविषयी अभ्यासपूर्ण माहिती मिळावी, त्यांचे प्रबोधन व्हावे याकरीता ॲड.बुद्धकुमार कांबळे यांच्या मार्गदर्शनपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, राहुल पांचाळ, सर्पमित्र शरण उबाळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. ॲड.बुद्धकुमार कांबळे यांनी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सापांविषयी विद्यार्थीच नव्हे तर सर्वांच्या मनात असलेल्या अनेक शंका – कुशंकांचे निरसन केले. जगातील सगळ्यात विषारी साप भारतात आढळतो त्याला इंडियन किंग कोब्रा असे संबोधले जाते. तर जगातील सगळ्यात मोठा बिनविषारी साप अजगर असल्याचे त्यांनी नमूद केले. काही साप पाण्यात, बिळात, झाडावर राहतात. सापाने एकदा कात काढली की तो मरत नाही हा एक फार मोठा गैरसमज आहे. कोणताही साप २१ वर्षांपेक्षा जास्त जगत नाहीत, असेही त्यांनी सांगितले. सापाचे पर्यावरणात अनेक फायदे आहेत. उंदराची एक जोडी वर्षात किमान एक हजार पिलांना जन्म देते. म्हणजेच एका जोडीपासून सरासरी ९४५ उंदरे जन्माला येतात. उंदीर आपली संख्या मोठ्या प्रमाणात वाढवतात. आपले २७ टक्के धान्य उंदरांमुळे नष्ट होते. काही काळापूर्वी प्लेगचा आजार उंदरांमुळेच पसरला होता. अशा सापापेक्षा कितीतरी पटीने घातक असणाऱ्या उंदरांना संपवण्याचे काम साप करत असतो. एक साप मारला तर अप्रत्यक्षपणे लाखो उंदरांना जीवदान दिल्यासारखे होते,असे सांगून कांबळे यांनी सगळेच साप विषारी नसतात. भारतात ३०० प्रजातीचे साप असून त्यापैकी बोटांवर मोजण्याइतक्याच जातीचे साप विषारी असतात, बाकीचे सगळे साप बिनविषारी असतात. त्यामुळे साप पाहून घाबरून न जाता सापाबद्दलचे गैरसमज दूर करून चालणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन चक्षुपाल कांबळे यांनी केले. या अभिनव उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक – शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे .

# घोटी ग्रा.पं. अंतर्गत वित्त आयोगाच्या निधीत गैरव्यवहार

किनवट/शेख शौकात :–तालुक्यातील घोटी ग्राम पंचायत अंतर्गत सन २०२३ – २४ आर्थिक वर्षात १५ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत २ लाख १८ हजार रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी ग्रामसेवकाच्या तक्रारीवरून घोटीचे सरपंच, पंचायत समितीचे ऑपरेटर व ग्राम पंचायत सदस्याविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी माजी उपसरपंच बालाजी पावडे यांनी जिल्हा परिषदेच्या (पंचायत) उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे केली आहे. किनवट तालुक्यातील घोटी ग्राम पंचायत येथे विविध विकास कामांसाठी सन २०२३ – २४ आर्थिक वर्षात १५ वा वित्तआयोजन अंतर्गत लाखो रुपयांचा निधी मंजूर झाला. परंतु गावातील सरपंच यांनी काही सदस्य तसेच पं. स. च्या ऑपरेटरला हाताशी धरून या योजनेअंतर्गत विकास आराखड्याला पंचायत समितीची मंजुरी न घेता २ लाख १८ हजार रुपयांचा निधी परस्पर उचल केला आहे. या बाबत घोटी ग्रा. पं. च्या ग्रामसेवकाने १० जुलै रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना लेखी पत्र दिले असून या पत्रात ग्रामपंचायत सदस्याचे सुपुत्र तथा पंचायत समिती कार्यायात ऑपरेटर म्हणुन कार्यरत असलेले साहेबराव वसंतराव भवरे व सरपंचाच्या सुपुत्रावर भ्रष्टाचाराचा ठपका ठेवला आहे. कोणत्याही कामाचा आराखडा तयार करून एक लक्ष रुपये साहेबराव वसंतराव भवरे यांना तर सरपंच सुपुत्र ५० हजार रुपये व ५० हजार मटेरियल तसेच १८ हजार रुपये पाणीपुरवठा दुरुस्ती बाबीसाठी उचल करण्यास सांगितले. ग्रामविकास अधिकारी यांची डीएससी लावून परवानगी न घेता सारखणी येथील एका एलईडी दुकानदाराच्या नावे सदर रक्कम उचल केल्याचे ग्रामसेवकाने पत्रात नमूद केले आहे.

:पंचायत समिती स्तरावरून या प्रकरणातील दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप पावडे यांनी केला असून सदर प्रकरणी तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून घोटीचे सरपंच पंचायत समितीचे ऑपरेटर व अन्य दोषी व्यक्तीवर कारवाई झाली नाही तर उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# जातनिहाय जनगणना काळाची गरज




नवी मुंबई / के. एच. हनवते :– मुंबई ओबीसी हा या देशाचा निर्माता असून उत्पादक समाज आहे. परंतु, राजकीय, सामाजिक, आर्थिक आदी क्षेत्रात ओबीसीला मिळणारा वाटा अतिशय तुटपुंजा आहे. त्यामुळे जातीनिहाय जनगणना होणे ही काळजी गरज आहे, असे मत ज्येष्ठ समाजशास्त्र : कांचा इलैया यांनी अधिवेशनाच्या उदघाटनीय भाषणात व्यक्त केले. नवी मुंबई खारघर येथील एमटीडीसी सभागृहात अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. हे राज्य अधिवेशन व एकदिवसीय चिंतन शिबीर मंडल स्तंभाचे निर्माता व माजी आमदार डॉ. नारायणराव मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. तर प्रमुख वक्ते टीस येथील संशोधक विद्यार्थी यशवंत झगडे व स्वागताध्यक्ष ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे अध्यक्ष व माजी उपजिल्हाधिकारी सुनील शेळके होते. पुढे बोलताना कांचा इलैया म्हणाले की, सरकार याबाबत कुठे सक्रिय दिसत नाही ही शोकांतिका आहे. ओबीसी समाजाचा फक्त मतदार म्हणून उपयोग केला जातो. त्यामुळे समाजाने एकत्र येऊन आपल्या हक्काची लढाई लढणे महत्वाचे आहे, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. ओबीसी प्रवर्गातील अधिकारी कर्मचारी हा समाजातील अतिशय महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे यांनी प्रवर्गाच्या हक्काबाबत जागृत असणे महत्त्वाचे असून येणाऱ्या प्रत्येक अडचणी सोडविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे मत मंडल स्तंभाचे निर्माते डॉ. नारायणराव मुंडे यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. ओबीसी प्रवर्गात अनेक जाती धर्मांचा समावेश असल्याने ओबीसी मधील जातीय चेतना नाहीशी करून, वर्गीय चेतना निर्माण करणे हे मुख्य उद्देश आहे. तसेच ओबीसीला समान भागीदारी मिळावी याकरिता जातीनिहाय जनगणना होणे आवश्यक आहे. म्हणून संघटनेच्यावतीने प्रत्येक जिल्ह्यात जात जनगणना परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच संविधान लागू होऊन ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने संविधान परिषदांचे आयोजन करण्यात येणार आहे. सोबतच संपूर्ण मंडल आयोगाची अंमलबजावणी व्हावी यासाठी संघटना सक्रियेतेने शासन स्तरावर दबाव निर्माण करत पाठपुरावा करणार आहे, असे मत संघटनेचे अध्यक्ष सुनील शेळके यांनी स्वागताध्यक्षिय भाषणात व्यक्त केले. आरक्षण ही एक किरकोळ सवलत त्यामुळे ओबीसींनी फक्त आरक्षण पुरते मर्यादित राहू नये. तर मंडल आयोगाने केंद्रात ओबीसी मंत्रालय असावे, लोकसंखेच्या तुलनेत बजेट, जमीन सुधारणा सारखे संरचनात्मक उपाय सुचवले आहेत. ज्याकडे ओबीसी चळवळीने येत्या काळात लक्ष देणे गरजेचे आहे. कारागिरांचे पारंपरिक व्यवसाय नष्ट होत आहेत त्यासाठी ठोस योजना असाव्यात. तसेच ओबीसी ही कोणतीही एक जात किंवा धर्म नसून आदी जात व धर्माचा बनलेला प्रवर्ग आहे त्यामुळे सर्व धर्मीय ओबीसींना सोबत घेऊन आपल्या हक्काचा लढा उभारावा, असे आवाहन झगडे यांनी केले. दुसऱ्या सत्रात संघटनेची पुढील दिशा यासंबंधी राज्याध्यक्ष सुनील शेळके व राज्य सल्लागार डॉ. शिवशंकर गोरे यांच्या मार्गदर्शनात चर्चासत्र घेण्यात आले, तसेच काही ठराव पारित करण्यात आले. त्यात प्रामुख्याने जुनी पेन्शन योजना लागू करावी, जातनिहाय जनगणना करावी, मंडल आयोगाची संपूर्ण अंमलबजावणी करावी, केंद्रात स्वतंत्र ओबीसी मंत्रालयाची स्थापना करावी, संख्येनुसार ओबीसींना बजेट देण्यात यावे, ओबीसींनीचा रिक्त पदांचा अनुशेष भरण्यात यावा, पदोन्नती आरक्षण मिळावे, घटनाबाह्य क्रिमीलेअर अट रद्द करण्यात यावी, राष्ट्रीय फेलोशिप विद्यार्थी संख्येनुसार उपलब्ध करून देण्यात यावे, सरकारी नोकरभरतीमधील खासगीकरण बंद करण्यात यावे, आदी ठराव एकमताने संमत करण्यात आले. ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन आणि चिंतन शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रमुख निमंत्रक संघटनेचे महासचिव राम वाडीभष्मे, संघटनेचे राज्य सल्लागार डॉ. शिवशंकर गोरे, मुंबई विभागीय अध्यक्ष महादेव मिरगे, कोकण विभागीय अध्यक्ष विजय केसरकर आदींनी सहकार्य केले. या शिबिरात राज्यभरातून पदाधिकारी उपस्थित होते. राम वाडीभष्मे महासचिव ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ

ज्येष्ठ समाजशास्त्र : कांचा इलैया यांचे मत; ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन व चिंतन शिबीर खारघर नवी मुंबई येथे संपन्न

## साईनाथ गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी चंदू बगडे यांची निवड



लातूर :--- लातूर शहर पूर्व भाग गरुड चौकातील साईनाथ गणेश मंडळाची आज दिनांक १०/०८/२०२४ रोजी गरुड चौकात बैठक संपन्न होऊन सर्वानुमते २०२४ वर्षाच्या साईनाथ गणेश मंडळाच्या अध्यक्ष पदी चंदू बगडे यांची निवड करण्यात आली तर स्वागताध्यक्ष गणेश फुले, बालाजी कल्लेकर, कार्यध्यक्ष :– अरुण गवळी,विजयकुमार गुडरे,उपाध्यक्ष – नंदकिशोर गंगणे, सचिव प्रवीण कंनमूकले, कोषाध्यक्ष -- महेश वंगाटे ,सहकोषाध्यक्ष -- मनोज गवळी, मार्गदर्शक :-- बाळाजी गवळी,दीपक गंगणे, प्रदीप बेबंडे, सदस्य :-- अमोल गायकवाड, सुरेश संगापुडे , दयानंद गवळी,कृष्णा गायकवाड, अर्जुन माने,अतुल सूर्यवंशी, आकाश कांबळे,मोहन कांबळे,शिवाजी गादगे ,माऊली ममदे, रवी धोरे,दिनेश सूर्यवंशी,लाला कांबळे, बिभीषण मेहेत्रे,पांडुरंग मारलापल्ले , बालाजी बडगिरे,शिवाजी बावगे,यांची सर्वानुमते निवड करण्यात आली साईनाथ गणेश मंडळाचे हे २८ वे वर्ष असून या वर्षी समजउपयोगी सामाजिक उपक्रम राबविन्याचे नियोजन करण्यात आले

# लोकप्रिय नेते : विजय नाहटा यांच्याकडे कार्यकर्त्यांचा ओघ






बेलापूर विधानसभा शिवसेनेत दिवसागणिक शेकडो कार्यकर्त्यांचा जाहीर पक्ष प्रवेश, कार्यकर्त्यांनो...निर्भिड आणि बिंदास्त जनतेची कामे करा शिवसेना खंबीरपणे आपल्या पाठीशी उभी आहे सरकार आपले राज्य आपलेच..! त्यामुळे कुणाला घाबरायच कारण नाही जो कोणी धमकी देईल त्याला आपन आपल्या शिवसेना स्टाईल ने उत्तर देण्याची ताकद आपल्यात आहे. जिनके नाम मे ही विजय है और वो है विजय नाहटा फाऊंडेशन अब वो कभी ना पिच्छे हटा..! महायुती असो अथवा नसो सर्वतोपरी आपण आपल्या ठिकाणी सक्षमपणे उभे आहोत आसे प्रखड मार्गदर्शन नवी मुंबई माजी आयुक्त, ख–ड अधिकारी : बेलापूर विधानसभेचे भावी आमदार : विजय नाहटा यांनी मांडले.

नवी मुंबई / के. एच. हनवते :– नवी मुंबईतील उबाठा च्या गटाला खिंडार पडले असून शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या उपस्थितीत उबाठा गटाचे विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखा प्रमुख आणि महीला पदाधीकारी व तसेच भाजपचे पदाधिकारी यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह नेरूळ येथील देवाडीगा भवन येथे झालेल्या पक्ष प्रवेश सोहळ्यामधे शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याच्या कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन व शिवसेना उपनेते : विजय नाहटा फाउंडेशन यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून नवी मुंबईतील उबाठाच्या गटातील विभाग प्रमुख तेजस महाजे, महीला उपविभाग संघटक पल्लवी काटकर, शाखा क्र.९५ आणि ९३ नेरूळ गावामधील शाखाप्रमुख गणेश राऊत, उपशाखाप्रमुख सुरज कोसले, उपप्रमुख संदीप सुर्वे, उपशाखाप्रमुख प्रवीण कुमार यादव, युवा शाखाधिकारी कुणाल रोटकर, युवा उपशाखाधीकारी दर्शन म्हाजे, उपशाखाधीकारी यश मोरे, गटप्रमुख वैभव म्हाजे यांसह शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला तसेच भाजपा नेरूळ विभाग प्रभाग क्र. ८७ युवा मोर्चा अध्यक्ष : हेमंत पोमण यांनी आपल्या समर्थकांसह यावेळी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी महिला जिल्हा संघटक: सरोजताई पाटील, उप जिल्हाप्रमुख: दिलीप घोडेकर, शहर प्रमुख: विजय माने, कामगार नेते: प्रदिप वाघमारे, उप जिल्हाप्रमुख: संजय भोसले, बेलापूर विधानसभा वैद्यकीय कक्ष अधिकारी: कल्पेश पाटील इत्यादी कार्यकर्ते पदाधीकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वरमध्ये एम-सेट परीक्षा उत्तीर्ण चौकटे रामेश्वर आणि शिंदे भीमाशंकर यांचा सत्कार संपन्न




लातूर :– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील राज्यशास्त्र विषयात एम–सेट परीक्षा उत्तीर्ण चौकटे रामेश्वर दत्तात्रय आणि इतिहास विषयात उत्तीर्ण शिंदे भीमाशंकर भागवत गुणवंत या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे आणि सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विचारमंचावर संस्थेचे संचालक श्री राजेश्वर बुके, संचालक श्री बाबुराव तरगुडे, न्यायाधीश आर. पी. कास्तिकर, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, प्रा. काशीनाथ पवार, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, इतिहास विभागप्रमुख डॉ. सदाशिव दंदे आणि संस्था प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ द्वारा आयोजित सहाय्यक प्राध्यापक पदासाठी दि. ०७ एप्रिल् २०२२४ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य पात्रता चाचणी (एम–सेट) परीक्षेचा निकाल दि.०४.०८.२०२४ रोजी जाहीर झाला. यामध्ये या गुणवंत विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केल्याबद्दल संस्थेचे सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक बस्वराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालिका ललिता पांढरे, संचालक राजेश्वर पाटील, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक गुरुलिंग धाराशिवे, संचालक महेश हालगे संस्था कार्यालय प्रमुख गुरुलिंग शेटे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी मनः पूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच आज आंदोलन

लातूर :– राज्यातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमधील आरक्षण तत्काळ लागू करणे, जुनी पेन्शन योजना तात्काळ प्रभावासह लागू करावी, रिक्त पदे तात्काळ भरावीत आणि राज्यातील कंत्राटी नोकर भरती धोरण रद्द करावे आदी मागण्यांसाठी लातूर कास्ट्राईब कर्मचारी महासंघ जिल्हा कार्यकारणीतर्फे मंगळवार, १३ ऑगस्ट, २०२४ दुपारी २ ते ६ या वेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, लातूर येथे आंदोलन करण्यात येणार आहे.

तरी संघटनांच्या सर्व पदाधिकारी यांनी जिल्हाधिकारी, लातूर येथे उपस्थित राहून सर्व नियमाचे पालन करुन आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहन लातूरचे जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे, सरचिटणीस अशोक माळगे, कार्याध्यक्ष गणेश राठोड, कोषाध्यक्ष प्रशांत म्हेत्रे, जिल्हा संघटक नागरत्न कांबळे, कास्ट्राईब शिक्षक संघटना अध्यक्ष सुभाष मस्के, राज्य उपाध्यक्ष राहूल गायकवाड, अतिरिक्त सरचिटणीस महेश कांबळे, संजय राऊत, छगन घोडके, जिल्हा परिषद विंगचे अध्यक्ष ओंकार वंजारे, सुधीर बोकेफोडे, कास्ट्राईब कर्मचारी संघटना जलसंपदाचे अध्यक्ष निलराज बनसोडे आणि कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE